# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

**अधिसभा निवडणूकसाठी व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची**
**तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत**

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त)[(28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी अधिसभेवर **(Senate)** निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहित) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.

सदर तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदीबाबतच्या हरकती स्पष्टीकरणासह संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह **कार्यालयीन वेळेत शुक्रवार, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२२ ते मंगळवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडे प्रत्यक्ष आणून देण्यात यावी अथवा **election@unipune.ac.in** या ईमेल वर आवश्यक कागदपत्रांसह पाठविण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

नोंदणीस अपात्र ठरलेल्या अर्जांबाबत कोणतेही दस्तऐवज अथवा कागदपत्रे नव्याने अपलोड करता येणार नाहीत किंवा स्विकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ८५
दिनांक : ०८/०९/२०२२